# ‘.........कविता !?’

एखाद्या रटाळ दुपारी, खिडकीशेजारल्या रखरखीत उन्हात,

गोंगाटणाऱ्या वर्गात.. नेमक्या टुकार पोरांच्या टोळक्यात,

करकरणाऱ्या बाकावर, चिकट चिकट अंगानं,

हिरवीगाााार उत्कट ‘कविता’ शिकणं जेव्हा नशिबी येतं,

.......तेव्हापासून........... ‘कविता’ म्हणजे नुसता जीवाचा उकाडा!

...एवढंच घाम टिपत लक्षात रहातं!

गजबजलेल्या कॉलेज कॅम्पात, गप्पाटप्पांच्या भाऊगर्दीत,

अशाच एखाद्या उनाड दिवशी, मस्तवाल कट्ट्यावरती...

बोलक्या घाऱ्या डोळ्यांची... गोड गौर वर्णाची... नखरेल मुलगी बटा उडवत,

लालचुट्टुक गुलाब धरत... ‘ही तुझ्यावरची!’ म्हणत... हाती जेव्हा एक चिठोरी सरकवते...

“आपल्यावरही होऊ शकते!?!!! प्रेमाचा झंकार करू शकते!!”..

....अशी कवितेची ताकद तेव्हा पहिल्याप्रथम कळून चुकते!

पाऊल चुकल्या वाटेवर, दिशाहीन रस्त्यावर..

भकास.... उदास मनाने, सैरभर विचाराने..

काळोखाची खोली मोजत, नैराश्याने चरफडत,

हिंमत हरवून, विश्वास गमवून जेव्हा कातळ छाती नरमून जाते,

एखादी नितळ ‘कविता’ अशाचवेळी निखळ प्रकाश देऊन जाते!

“ ‘कविता’ म्हणजे साहित्यातील फक्त कोरीव लेणं नसून

तुमच्या आमच्या हृदयीला हात घालणारं देणं आहे!”

असंच काहीसं नाजूकसाजुक स्पंदन हृदयातून उमटल्याचं तेव्हा लक्षात येतं.

कोणालातरी मिस्स्स्स करताना... एखादीला इम्प्रेस करताना...

रटाळ भाषणाचा समारोप भाव खाऊन करताना...

झटपट एसएमएस साठी किंवा स्लॅम बुकभरताना..

CONFIDENTIAL

लव्ह लेटरच्या शेवटी हळवं हळवं लिहिताना...

चार ओळी मनासारख्या हाती जर सापडल्या..

आतलं आतलं हळुवार बोलून दोन हृदयं भिजवून गेल्या...

तर 'कविता म्हणजे जीव की प्राण.. रोमँटिक लोकांचं रंगीलं पान!'

असं समजून एखादा वेडा खरंच 'कविता' लिहायला बसतो,

शहाणा होऊन तेव्हाच उठतो... जेव्हा 'कविता' जगायला शिकतो!

खरंच 'कविता' म्हणजे नेमकं काय?

'र'ला 'ट' जुळवलेलं कोरडगाणं नक्कीच नाही!

चालीत बांधता येईलच असं बंधनही नाहीच नाही!

कवीच्या लेखणीची मक्तेदारी तर मुळीच नाही..

तुमच्या आमच्या संवेदना... सहवेदना असंच काही!

डबडबणाऱ्या डोळ्यातून थेट काळजात पाझरणारी,

मनाला रूचणारी... मनमुराद झुरवणारी...

हृदयीचं सल कागदावर अलवार् उतरवणारी... एक धुंद... नशीली झिंग!

'कविता' म्हणजे गुलाबी थंडीतलं एकुटवाणं धुकं!

समोरचं नीटसं दाखवतही नाही... उजाडल्यावर रहातही नाही!

***: जिगीषा***

CONFIDENTIAL